माहितीचा
अधिकार

**महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर**
**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये**
**प्राप्त झालेले व्दितीय अपील**

**अपील क्रमांक : ११५१/२०२२**

**अपिलार्थी, श्री. झनकलाल सहेसराम बिसेन**

**विरुध्द**

**जन माहिती अधिकारी तथा सचिव,**
ग्राम पंचायत, बबई, पो. गिधाडी, ता. गोरेगांव जि. गोंदिया

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी,**
पंचायत समिती, गोरेगांव ता. गोरेगांव जि. गोंदिया

महिती आयोग खंडपीठ नागपूर
सत्यमेव जयते
*नागपूर*

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : ०९.०७.२०२४**

**अपीलकर्ता : उपस्थित**
**जन माहिती अधिकारी : उपस्थित**
**प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित**

| **मूळ अर्जाचा दिनांक** | **जन माहिती अधिकाऱ्याच्या उत्तराचा दिनांक** | **प्रथम अपीलाचा दिनांक** | **प्रथम अपीलीय प्राधिकाऱ्याच्या निर्णयाचा/आदेशाचा दिनांक** |
|---|---|---|---|
| ०२.१२.२०२१ | १०.१२.२०२१ | ०४.०१.२०२२ | २८.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम ६(१) नुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे **दिनांक ०२.१२.२०२१** रोजी माहितीचा अर्ज सादर केला असून त्यात त्यांनी " मोबाईल टॉवरला परवानगी देतांना सामाजिक आघाता संदर्भात केलेल्या अभ्यासाचा संपुर्ण तपशील " इत्यादी एकुण पाच मुद्यांवर माहिती मागितलेली आहे. सदर माहिती अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी मुद्देनिहाय प्रतिसाद दिलेला आहे. त्यानंतर अपिलार्थी यांनी **दिनांक ०४.०१.२०२२ रोजी** कलम १९ (१) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे " मागितलेली माहिती आजपर्यंत पुरविण्यात आलेली नाही" असे कारण नमूद करुन प्रथम अपील दाखल केले. त्यावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८.०१.२०२२ रोजी सुनावणी घेवून, अपील अशंता मंजुर करण्यात येत असुन, जन माहिती अधिकारी, ग्राम पंचायत, बबई यांनी अपिलार्थीने मागणी केलेली व ग्राम पंचायत अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती १० दिवसाचे आत पुरविण्यात येवून तसा अनुपालन सादर करावा, असे आदेशीत केले.

तद्नंतर अपिलार्थी यांनी माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) नुसार आयोगाकडे **दिनांक २७.०४.२०२२ रोजी** " जोडपत्र अ मध्ये मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपूर्ण दिलेली आहे, माहिती देण्यास टाळाटाळ करण्यात येत आहे. तसेच कलम २०(२) नुसार दंड व शास्ती जन माहिती अधिकारी यांना करण्यात यावा " असे कारण नमुद करून द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपीलावर आज दिनांक ०९.०७.२०२४ रोजी ऑनलाईन सुनाबणी आयोजित करण्यात आली असून

सुनावणी दरम्यान अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा सचिव श्रीमती सरीता लील्हारे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी श्री. शुभम जाधव ऑनलाईन पध्दतीने उपस्थित आहेत.

सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रे व सुनावणी दरम्यान उत्तरवादी यांनी केलेल्या युक्तीवादावरुन असे निदर्शनास आले की, अपिलार्थी यांनी दाखल केलेल्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने, मोबाईल टॉवरला परवानगी देतांना रेडिएशन मुळे होणाऱ्या दुष्परिणामाबाबत केलेल्या चौकशीचा अहवाल इत्यादी माहितीचा समावेश असुन, प्रस्तुत प्रकरणी याबाबतीतील कुठलीही माहिती उपलब्ध असुन, दिनांक १७.१२.२०२१ रोजी प्रदान करण्यात आली असुन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती ही अतिशय क्लिष्ट व तांत्रीक स्वरुपाची असुन, याबाबतीत दस्ताऐवज स्वरुपात कुठलीही माहिती ग्राम पंचायतीच्या अभिलेखावर उपलब्ध नसल्याने, उपलब्ध असलेली माहिती देण्याचे निर्देश अपिलीय अधिकारी यांनी दिलेले आढळुन येतात. त्याविरुध्द अपिलार्थी यांनी दिनांक २७.०४.२०२२ रोजी प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज दाखल केलेला आहे. मागितलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती लक्षात घेता, यातील कुठलीही माहिती ही दस्ताऐवज स्वरुपात कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध नसल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत, व मोबाईल टॉवर मुळे होणारे रेडिएशन इत्यादी बाबतीत राज्य व केंद्र सरकारने तसेच TRAI सारख्या सक्षम प्राधिकरणांनी याआधीच याविषयावर सखोल अभ्यास केला असुन, त्याबाबतीत तयार केलेले अहवाल हे सार्वजनिक संकेतस्थळावर सर्वच नागरीकांनसाठी विनामुल्य उपलब्ध असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत, दाखल केलेला व अपिलार्थी यांनी ग्राम पंचायत, बबई येथून कार्यालयीन अभिलेखात उपलब्ध असलेली माहिती याआधीच प्राप्त झाली असल्याची वस्तुस्थिती लक्षात घेत, प्रस्तुत द्वितीय अपील अर्ज निकाली काढून नस्तीबध्द करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

**द्वितीय अपील नस्तीबध्द करण्यात येत आहे.**

महाराष्ट्र राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर ★ नागपूर ★

(राहुल भा.पांडे)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : ०९.०७.२०२४**

जावक क्रमांक E८98 दिनांक 20 SEP 2024